वृत्तपत्राचे नांव :– सामना

वृत्तपत्र प्रकाशनाचे ठिकाण :– मुंबई

वृत्तपत्र पान क :– 4

दिनांक :–21/04/2009

अध्यात्म

मंदा आचार्य

# वेदातील विचारकण



वैदिक ऋषींनी माणसाची आयुर्मर्यादा १०० वर्षे मानली आहे. हे जीवन ईश्वराने पृथ्वीवर सुंदरतेने जगण्यासाठी, व्यतीत करण्यासाठी बहाल केलं आहे. परंतु काळजीपूर्वक आणि निश्चिंत समर्पित जीवन केवळ स्वास्थ्य, आरोग्य आणि नीतीने वागूनच हे जीवनलक्ष्य साध्य करता येतं हेही सांगितलं आहे. पापाचरण सफल जीवनात येणारा एक मोठा अडथळा आहे. पाप म्हणजे दुष्कर्म. वेदामध्ये पापांसाठी चार शब्द वापरले आहेत ते असे - पाप - मनाचं पाप, अहंस एनस आणि अघ - आपले विचार हे पाप वाढविण्याचं स्थान आहे. विचार विकृत झालं की, मन कुमार्गाकडे प्रवृत्त होतं. म्हणून विचार, बुद्धी सुप्रतिष्ठित असणे आवश्यक आहे. वैदिक आर्यांनी आपल्या हातून असे पाप, दुष्कृत्य होऊ नये म्हणून देवदेवतांना प्रार्थना केल्या आहेत. ऋग्वेद, यजुर्वेद, अथर्व वेद सर्वत्र अशा प्रकारच्या ऋचा आढळतात.